# NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

Year: 20 | 1st December 1995 | No. 6

# "विद्यापीठांनी आपल्या पायरीने वागले पाहिजे"

[illegible]

[illegible]

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधानपरिषद सदस्य*

विद्यापीठांनी आपल्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या व शिक्षकांच्या संघटनेच्या कामकाजाकरिता आपल्या परिसरामध्ये लहानमोठी जागा उपलब्ध करून देणे हे सबंध देशभरच एक मान्य झालेले तत्त्व दिसून येते. शासन सुद्धा या सिद्धान्ताला अपवाद असलेले दिसून येत नाही. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेला खुद्द मंत्रालयामध्येच कार्यालयीन कामकाजाकरिता जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, ती शासनाने हे तत्त्व मान्य केले म्हणूनच होय. असे असतांना विद्यापीठाने आपल्या अधिकार क्षेत्रामधील शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त पंजिबद्ध संघटनेला अशी लहान मोठी जागा उपलब्ध करून दिली तर विद्यापीठाला "ही कृती रद्द करा" असा हुकूम फर्मावणे हे निषेधार्ह आहे. अमरावती विद्यापीठाच्या बाबतीत ३० सप्टेबर १९९५ च्या एका पत्रान्वये शासनाने विद्यापीठाला असा हुकूम दिलेला आहे. **(सहपत्र एक)**. आपल्या अधिकार क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनेला कार्यालयीन कामकाजाकरिता एखादी जागा उपलब्ध करण्याची विद्यापीठाने केलेली व्यवस्था अशा रितीने रद्द करणे म्हणजे विद्यापीठाला आपल्या पायरीने वागायला सांगणे होय आणि आश्चर्याची गोष्ट अशी की सभागृहामध्ये इतर सभासदांना पायरीने वागा असे सांगणारे सदस्य आता विद्यापीठांना सुद्धा पायरीने वागायला सांगण्यात पुढाकार घेत आहेत. कोणाच्याही पुढाकाराने निघालेला असेल तरी शासनाचा ३० सप्टेबर १९९५ चा एवढ्या लहानशा बाबतीत विद्यापीठाचे हात पिरगळणारा हा हुकूम निषेधार्हच होय. **"विद्यापीठांची स्वायत्तता" वगैरे शब्दरचना फार मोठी झाली पण एवढा किरकोळ निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य विद्यापीठांना नाही असे नमुद करणारा महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या इतिहासात शासनाने काढलेला एवढा काळा हुकूम यापूर्वी कधीही पहाण्यात आला नव्हता.**

२. विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये यातून काम करणाऱ्या शिक्षकांच्या संघटनेच्या कार्यालयीन कामकाजाकरिता विद्यापीठाने जागा उपलब्ध करून देण्याची पद्धती महाराष्ट्रामध्ये नवीन नाही. सर्वात जुन्या अशा मुंबई विद्यापीठामध्ये गेल्या अनेक वर्षापासून "मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघटने"ला (BUCTU) मुंबई विद्यापीठाने जागा उपलब्ध करून दिलेली आपणास दिसून येते. गेले २५-३० वर्षे तर मी स्वतःच हे पहात आहे व अनुभवत आहे. मुंबई येथे ७९, महर्षी कर्वे मार्गावर "**किंम्मतराय बिल्डिंग**" या नावाची एक भव्य पाच-सहा मजली इमारत मुंबई विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रात होती. १९७४-७५ च्या कितीतरी आधी पासून **मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या** (BUCTU) **कार्यालयीन कामकाजाकरिता दुसऱ्या माळ्यावर एक मोठी व प्रशस्त जागा विद्यापीठाने उपलब्ध करून दिली होती.** १९७४-७५ च्या दरम्यान महाराष्ट्र प्राध्यापक संघाची स्थापना झाली व महाराष्ट्र प्राध्यापक संघाचे मुंबई येथील कार्यालय व कामकाज मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघटनेला (BUCTU) उपलब्ध करून दिलेल्या जागेतूनच आजतागायत चालत आलेले आहे.

३. १९७४-७६ च्या दरम्यान विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतनश्रेणी लागू करतांना २ नोव्हेंबर १९७४ च्या एका पत्रान्वये भारत सरकारने राज्याच्या शिक्षण सचिवांना "For **future recruitment** to the posts of lecturers in universities as well as in colleges the minimum qualifications shall be as may be prescribed by the University Grants Commission from time to time." असे कळविले होते. त्याप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची जी घोषणा महाराष्ट्राच्या त्यावेळच्या शिक्षण मंत्र्यांनी, दिनांक ४ एप्रिल १९७५ रोजी महाराष्ट्र विधानसभेत केली, त्यामध्ये "विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी जशाच्या तशा शासनाने स्वीकारल्या आहेत. **या वेतनश्रेणी विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा विद्यापीठांनी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना देण्यात येतील.**" असा स्पष्ट उल्लेख होता. पण पुढे देशामध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली याचा फायदा घेवून शासनाने "राईट अबाऊट टर्न" ची भूमिका घेतली. विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्यासाठीचा शासन निर्णय (क्रमांक USG-1174/104287) हा दिनांक ४ आक्टोबर १९७५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. **"These qualifications are applicable to both existing teachers and the teachers who may be recruited hereafter."** अशा प्रकारची उलटी शब्द रचना या शासननिर्णयामध्ये टाकण्यात आली. शब्द फिरविण्याच्या शासनाच्या या भूमिकेमुळे उच्च शिक्षण क्षेत्राला कमालीचा धक्का बसला, कुलगुरू हादरून गेले. महाराष्ट्र प्राध्यापक संघाने याचा धिक्कार केला.

४. ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासन निर्णयाचा धिक्कार करणारी महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या कार्यकारी मंडळाची जी सभा ऑक्टोबर १९७५ च्या शेवटच्या आठवड्यात झाली होती ती "किंम्मतराय बिल्डिंग" या महर्षी कर्वे मार्गावरील मुंबई विद्यापीठाच्या इमारतीमधील मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या (BUCTU) कार्यालयामध्ये झाली होती. मी स्वतः महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य या नात्याने या बैठकीला हजर होतो. मला आजही स्पष्टपणे आठवते, इमारतीच्या तळाशी पोलिसांचा गराडा पडला होता पोलीस वाहनांचा मोठा ताफा हजर होता. शासनाचा धिक्कार करणारा ठराव महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत मंजूर झाला. धिक्काराच्या एका जाहीर सभेनंतर महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या अध्यक्ष व सरचिटणिसांना १ नोव्हेंबर १९७५ रोजी 'मिसा'खाली अटक करून १५ महिने अटकेत ठेवण्यात आले. महाराष्ट्रातील कोणत्याही प्राध्यापकाने ही नवीन वेतनश्रेणी स्वीकारली नाही. पुढच्या १५ महिन्याच्या काळासाठी कार्यकारी अध्यक्ष व सचिव यांची निवड महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या कार्यकारी मंडळाने केली ती याच बिल्डिंगमध्ये झालेल्या बैठकीत. २६ जानेवारी १९७७ रोजी अध्यक्ष व सचिवांची सुटका झाल्यानंतर कार्यकारी सचिवांनी अशी सुटका झाल्याचे २७ जानेवारी १९७७ चे वृत्तपत्रीय निवेदन **(सहपत्र दोन)** सुद्धा याच इमारतीमधील कार्यालयातून प्रसिद्ध

केले होते. **या वृत्तपत्रीय निवेदनावर संघटनेचा कार्यालयीन पत्ता नमूद होता.** या घटना घडत असतांना देशात आणीबाणी होती, महाराष्ट्रामध्ये श्री. शंकररावजी चव्हाण हे मुख्यमंत्री होते. पण त्यांनी संघटनेला दिलेल्या **या कार्यालयीन जागेचे "हस्तांतरण रद्द करा" असा हुकूम मुंबई विद्यापीठाला दिला नाही. आणीबाणीमध्ये सुद्धा जो हुकूम निघाला नाही तो आजच्या शासनाने ३० सप्टेंबर १९९५ रोजी अमरावती विद्यापीठाच्या टाळक्यावर हाणला आहे.**

५. १९७८ मध्ये श्री सदानंद वर्दे हे शिक्षणमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या कार्यकारी मंडळाबरोबर त्यांनी दोन अडीच तास चर्चा केली ती या "किंम्मतराय बिल्डिंग" मधील कार्यालयामध्येच. पुढे ही इमारत बरीच जुनी झाल्यामुळे व मोडकळीस आल्यामुळे तिची पुनर्बांधणी करण्याचा जेव्हा निर्णय झाला, तेंव्हा मुंबई विद्यापीठाने या इमारतीमध्ये असलेली आपली सर्व कार्यालये अन्यत्र हालविली. तत्कालीन कुलगुरू मा. डॉ.गोरे यांनी स्वतः लक्ष घालून **चर्चगेट जवळील "क्लब हाऊस" या मुंबई विद्यापीठाच्या मालकीच्या इमारतीमध्ये मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या (BUCTU) कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून दिली** व तेव्हा पासून आजपावेतो मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे (BUCTU) व महाराष्ट्र प्राध्यापक संघाचे कार्यालयीन कामकाज क्लब हाऊस या इमारतीमधल्या जागेतूनच चालत आहे.

**६. नागपूर विद्यापीठाने सुद्धा नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाला कार्यालयीन कामकाजासाठी गेल्या अनेक वर्षापूर्वी जागा उपलब्ध करून दिली आहे.** विधीमहाविद्यालयाला लागून असलेल्या डी. लक्ष्मीनारायण यांच्या बंगल्यामध्ये ही जागा आहे. १९८७ मध्ये शासनाने मान्य केलेल्या सूत्रानुसार शासन निर्णय न काढता खूप मोठ्या प्रमाणावर कार्यभार वाढविण्याबाबतची एक योजना त्यावेळच्या नोकरशाहीने तयार केली होती. १२ डिसेंबर १९८८ पासून महाराष्ट्रभर त्यामुळे प्राध्यापकांचा संप सुरू झाला. महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहाचे अधिवेशन नागपूरात सुरू होते. महाराष्ट्र शासन नागपूरात होते. **नुटाच्या कृती समितीच्या बैठकी डी. लक्ष्मीनारायण बंगल्यातील या कार्यालयामध्येच होत असत.** या बंगल्यासमोरील आवारामध्ये प्राध्यापकांच्या मोठमोठ्या सभा झाल्यात. महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक याच काळांत १९ डिसेंबर १९८८ रोजी नागपूर येथे झाली ती सुद्धा डी. लक्ष्मीनारायण बंगल्यातील नुटाच्या कार्यालयामध्ये. या सर्व वेळी माहिती घेण्यासाठी पोलीस, एल.आय.बी, व सी.आय.डी. चे लोक असत, आंदोलनाबाबतची सर्व माहिती शासनाला जात असे. शासन नागपूरातच होते. श्री. शरदराव पवार मुख्यमंत्री होते. त्यांचाही पूर्ण वेळ मुक्काम नागपूरातच होता, पण त्याही वेळी "या जागेचे हस्तांतरण रद्द करा" असा हुकूम शासनाने नागपूर विद्यापीठाला दिला नाही. आपल्या विरुद्ध शासन 'लोकराज्या'चा अंक काढत आहे/काढला आहे. टी.व्ही. वर मुलाखती आयोजित केल्या आहेत, करणार आहेत याची चर्चा प्राध्यापकांच्यामध्ये होत असे, **पण "कार्यालयीन जागेचे हस्तांतरण रद्द करा" असा हुकूम शासन विद्यापीठाला देईल अशी कल्पना सुद्धा कधी त्यावेळी कोणाच्या मनाला शिवली नाही. राज्यकर्त्यांच्या वैचारिक उंचीविषयीचे अंदाज लोकांच्या मनामध्ये असतात व त्यावरच या कल्पना बांधलेल्या असतात.**

७. अमरावती विद्यापीठाची स्थापना १ मे १९८३ रोजी झाली. विद्यापीठाचा कारभार विदर्भ महाविद्यालय या शासकीय महाविद्यालयाच्या "आउट हाऊस"मध्ये सुरू झाला. विद्यापीठाच्या कामकाजासाठीच पुरेशी जागा उपलब्ध नव्हती तर मग विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षकांच्या संघटनांच्या कार्यालयीन कामकाजाकरिता जागा उपलब्ध करून देण्याचा प्रश्नच उद्भवला नाही व तशी कुणी मागणीही केली नाही. हळूहळू ५-६ वर्षामध्ये विद्यापीठाच्या कामकाजाला स्थिरता यायला लागली. विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनांना जागा उपलब्ध करून देण्याविषयीची बाब अमरावती विद्यापीठाच्या १६ जून १९९५ च्या खुलासा करणाऱ्या एका अधिकृत प्रसिद्धी पत्रकामध्ये **(सहपत्र तीन)** नमूद आहे ती पुढील शब्दात :-

"विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांच्या अधिकृत, पंजिबध्द प्रातिनिधीक संघटनेच्या कामकाजाकरिता विद्यापीठ परिसरामध्ये यथोचित जागा उपलब्ध करून देण्याच्या सर्वसाधारण धोरणास अनुसरून **शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संघटनेस यापूर्वीच तात्पुरती जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.** नागपूर येथे पूर्ण चंद्रराव बुटी मेमोरियल हॉल यासारखा मोठा परिसर व वास्तू विद्यार्थी संघासाठी उपलब्ध आहे. अमरावती विद्यापीठ परिसरामध्ये "**विद्यार्थी भवन**" पूर्णत्वास आले असून लवकरच ते कार्यान्वित करण्याची कारवाईहि चालू आहे."

८. दिनांक १६ जून १९९५ च्या विद्यापीठाच्या याच पत्रकात शिक्षक संघटनेला कार्यालयीन कामकाजाकरिता जागा उपलब्ध करून देण्याबाबत पुढील प्रमाणे उल्लेख आहे. "नागपूर विद्यापीठाने "नुटा" या शिक्षक संघटनेला विधी महाविद्यालयाला लागून असलेल्या डी. लक्ष्मीनारायण यांच्या बंगल्यातील प्रशस्त जागा अनेक वर्षापूर्वी कार्यालयासाठी उपलब्ध करून दिली आहे. **अमरावती विद्यापीठ परिसरामध्ये जागेच्या टंचाईमुळे हे शक्य झाले नव्हते. तथापि "संलग्न महाविद्यालये व विद्यापीठे यामध्ये काम करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांच्या पंजीकृत असलेल्या संघटनेच्या कामकाजासाठी शिक्षक भवन उभे करण्याचा निर्णय २९ एप्रिल १९८९ च्या बैठकीमध्ये त्यावेळच्या कार्यकारी मंडळाने घेतला होता. याच प्रयोजनासाठी १ लाख रुपयाची देणगी सुद्धा त्यावेळी विद्यापीठाला प्राप्त झाली होती**"

---

**३० सप्टेंबर १९९५ चा हाच तो काळा हुकूम** — सहपत्र एक : परिच्छेद १ व १६ पहा

*अ.शा.प.क्र. युएसजी/१५९५/(१२९/९५)/विशि-३ **उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग***
*मंत्रालय विस्तार भवन. मुंबई-४०० ०३२. **दिनांक ३० सप्टेंबर, १९९५***

**विषय :-** अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी अवैधरित्या "नुटाला" हस्तांतरित केलेल्या शिक्षक भवनाचा ठराव रद्द करणेबाबत.

प्रिय श्री.

उपरोक्त विषयासंदर्भात कुलसचिव, अमरावती विद्यापीठ यांचे क्र.अवि/१/१२१/ए/१८६०/९५, दिनांक ५ सप्टेंबर, १९९५ चे पत्र पहावे.

२. या प्रकरणी शासनाचे आपणांस असे आदेश आहेत की, "शिक्षक भवनाची" वास्तु नुटाला हस्तांतरित करून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८(१)(ड) चा भंग केला आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, मधील कलम ८ (४) प्रमाणे ही स्थावर मालमत्ता असून आपण ती तात्काळ परत ताब्यात घ्यावी.

आपला स्नेहांकित
(त्रि.ब.सेन)

डॉ. कैलास खामरे,
कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ, अमरावती.

९. विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक यांच्या प्रातिनिधिक पंजिबध्द संघटनेच्या कामकाजाकरिता जागा उपलब्ध करून देण्याचा प्रश्न विद्यापीठाच्या विचाराधीन असतांनाच डॉ. उध्दवराव देशमुख यांनी १ लाख रुपयाची देणगी अमरावती विद्यापीठाला दिली. या देणगीचा वापर कसा व्हावा याबाबत २७.४.१९८९ च्या आपल्या पत्रामध्ये ते म्हणतात :-

"त्या वास्तुला "स्व. डॉ. जयश्री देशमुख शिक्षक भवन" असे नांव द्यावे. संलग्न महाविद्यालये व विद्यापीठ यातून काम करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांच्या पंजीकृत असलेल्या कार्यरत संघटनेच्या कामकाजासाठी या वास्तुचा वापर व्हावा अशी माझी इच्छा आहे."

**१०.** अमरावती विद्यापीठ कायदा १९८३ अन्वये दाननिधी स्वीकृत करण्याचे अधिकार विद्यापीठाला होते व त्याच **कायद्याच्या कलम २५(१)(XIV) मधील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या वतीने "दाननिधी स्वीकृत करण्याचा अधिकार" हा कार्यकारी मंडळाचा होता.** त्यावेळच्या कार्यकारी मंडळाने डॉ. उध्दवराव देशमुख यांनी २७.४.१९८९ च्या पत्रान्वये केलेल्या उपरोक्त विनंतीचा विचार करून २९ एप्रिल १९८९ रोजी झालेल्या आपल्या बैठकीत (विषय क्रमांक ७६ वर) घेतलेला निर्णय कार्यकारी परिषदेच्या कार्यवृत्तामध्ये पुढील शब्दात नोंदविला आहे. :- **"considered the letter of the donor dated 27.4.89 and resolved to accept his request contained in the letter."**

**११.** एक लाख रुपयाची देणगी जरी विद्यापीठाने १९८९ मध्ये स्वीकारली तरी प्रत्यक्ष हे काम पूर्ण करण्यास विद्यापीठाला ४-५ वर्षाचा काळ लागला. त्यानंतर याबाबत अमरावती विद्यापीठाने केलेली कारवाई १६ जून १९९५ च्या अमरावती विद्यापीठाच्या अधिकृत प्रसिध्दी पत्रकामध्ये **(सहपत्र तीन)** पुढील शब्दात नमूद आहे. :-

"याच प्रयोजनासाठी १ लाख रुपयाची देणगी सुद्धा त्यावेळी विद्यापीठाला प्राप्त झाली होती व सदरहू देणगीनुसारची कारवाई सुद्धा पूर्ण करण्यात येत आहे. ही वास्तू पूर्णत्वाला आल्यानंतर दिनांक १ जुलै १९९४ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून पंजिबध्द शिक्षक संघटनांकडून अर्ज मागविण्यात आले होते. या प्रत्येक संघटनेने (१) नांव (२) नोंदणी क्रमांक व वर्ष (३) मागील तीन वर्षाचे अंकेक्षीत लेखे (४) सभासद संख्या याबाबतची माहिती दाखल करावी असेही नमूद करण्यात आले होते..... "नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ" नागपूर व दारव्हा जि. यवतमाळ येथून अमरावती विद्यापीठ ग्रामीण शिक्षक मंच या दोनच संघटनांचे अर्ज विद्यापीठाकडे आलेले होते. (१) पहिल्या संघटनेने ३२८२ **सदस्यांची मुद्रित यादी** आपल्या अर्जासोबत जोडली होती. दुसऱ्या संघटनेने सदस्यांची अशी कोणतीही यादी सोबत जोडलेली नव्हती. मात्र आपली सदस्य संख्या ३५० असल्याचे नमूद केले होते. (२) दाखल झालेल्या कागदपत्रानुसार पहिली संघटना १९६३ मध्ये **स्थापन झाली** असून १९७३ मध्ये पंजिबध्द झालेली आहे. दुसरी संघटना वृत्तपत्रामध्ये जाहिरात येण्याच्या २-३ महिने अगोदर म्हणजे ४ मार्च, १९९४ ला पंजिबध्द झाल्याचे दिसून येते. (३) पहिल्या संघटनेने अर्जापूर्वीचे तीन वर्षाचे **अंकेक्षीत लेखे** अर्जासोबत सादर केले असून दुसरी संघटना नुकतीच स्थापन झालेली असल्यामुळे अंकेक्षित लेखे सादर करू शकली नाही. **या मुद्यांचा तुलनात्मक विचार करून व्यवस्थापन परिषदेने पहिल्या संघटनेचा अर्ज मान्य केला. "नुटा ही संघटना नागपूर विद्यापीठ कार्यक्षेत्रापुरती मर्यादित आहे" हे वार्तापत्रातील विधानसुद्धा वस्तुस्थितीवर आधारित नाही."**

**१२.** विद्यापीठाचे निर्णय काळजीपूर्वक नजरेखालून घातल्यास पुढील गोष्टी स्पष्टपणे लक्षात येतात.

(i) अमरावती विद्यापीठामध्ये "संलग्न महाविद्यालये व विद्यापीठ यामध्ये काम करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांच्या पंजीकृत असलेल्या संघटनेच्या कामकाजासाठी शिक्षक भवन उभे करण्याचा" निर्णय २९ एप्रिल १९८९ च्या बैठकीमध्ये कार्यकारी मंडळाने घेतला. **त्यावेळी या विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची "नुटा" ही एकमेव पंजिबध्द संघटना होती.**

(ii) कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याच्या प्रयोजनासाठी १ जुलै १९९४ ला विद्यापीठाने वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिली **त्याच्या दोनतीन महिने अगोदर दुसरी एक संघटना अस्तित्वात आली होती** तिची तुलनात्मक स्थिती वर दिली आहे.

(iii) वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिल्यानंतर काही महिन्यांनी आणखी तिसऱ्या एका संघटनेचा जन्म झाला. त्याबाबतचा उल्लेख विद्यापीठाच्या पत्रकात पुढील शब्दात आहे. :- "या प्रयोजनासाठी नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचा (नुटा) अर्ज मान्य करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेनेच दिनांक ३ जून १९९५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतला. "उटा" या नावाच्या कोणत्याही संघटनेने अर्ज केलेला नव्हता व त्यामुळे तो विचारात घेण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही."

**१३.** अंतिमतः व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ३ जून १९९५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये जुनी सर्व कागदपत्रे व आलेल्या दोन संघटनांच्या अर्जाची तुलनात्मक स्थिती लक्षात घेवून पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला :-

"Council noted that there were only two applications received within due date namely, (1) Nagpur University Teachers' Association and (2) Gramin Shikshak Manch. In respect of the information obtained by giving advertisement in the newspapers on 1.7.1994, following is the comparison :

*सहपत्र दोन : परिच्छेद ४ पहा*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANISATION**

**Kimatrai Building, 79 Maharashi Karve Marg,**
Bombay 400 002. : 27th January, 1977

Dr. L.B. Kenny and Prof. K.K.Theckedath, President and General Secretary of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations and also of the Bombay University Teachers' Union, who were arrested under MISA on 1st November 1975 and detained since then for 15 months in Yeravada Central prison, Pune, were released yesterday.

Dr. Kenny and Prof. Theckedath were given a very warm and enthusiastic welcome at V.T. Railway Station this morning by their Co-workers in the Teachers' Movement, relatives and other well-wishers.

Among those present to receive them were Prof. V.B. Kamath, the Officiating President of the M.F.U.C.T.O.and B.U.T.U., Prof. A.N. Oza, representing the Bombay University Academic Staff Association, and Dr. S.S.Hoskot, a senior College teacher.

Immediately after their return to Bombay Dr. Kenny and Prof. Theckedath have taken over the reins of the M.F.U.C.T.O. and the B.U.T.U. from the present Officiating President and the Officiating Secretary.

Sd/- E.N.Manjrekar,
Officiating Secretary.

**असा हुकूम तर आणिबाणीमध्ये सुध्दा निघाला नव्हता**

(i) It appears on record that the Nagpur University Teachers' Association is working since 1963 having registration No. in 1973, whereas, Gramin Shikshak Manch appears to be registered in the said year of advertisement, i.e. on 4th March, 1994 as per information given by the organisation.

(ii) In respect of the audited statement of the preceding three years, the Nagpur University Teachers' Association has given the audited statements of the preceding three years as required along with the application. Whereas, in respect of the audited statements of the last three years Gramin Shikshak Manch has mentioned in their application that "Since the Organization was established on 4th March, 1994, any such audited statements could not be submitted along with their application."

(iii) In respect of the membership of the organization, it has been observed that a printed Alphabetical List of 3282 members as on 1st of January, 1994, is enclosed along with the application of Nagpur University Teachers' Association. Whereas, Gramin Shikshak Manch has not given any such list and merely mentioned that there are 350 members.

**Considering the comparitive information in respect of the above two applications, Council resolved to approve the application of Nagpur University Teachers' Association in this respect."**

१४. गेले एक वर्षभर तयार होवूनहि पडून असलेली ही लहानशी वास्तू ज्या प्रयोजनासाठी बांधण्यात आली त्या कामासाठी उपयोगात आणण्याच्या उपरोक्त निर्णयामध्ये "for the use of Nagpur University Teachers' Association" अशी स्पष्ट शब्द रचना आहे. एका संघटनेच्या काही विद्यार्थ्यांनी २३ जून १९९५ रोजी आपल्या ८-१० मागण्यासाठी अमरावती विद्यापीठावर मोर्चा आणला ८-१० मागण्यांच्या विचारार्थ दोन दिवसात व्यवस्थापन परिषदेची व तीन दिवस विव्दत परिषदेची आपण बैठक बोलावू असे आश्वासन मा. कुलगुरुंच्या कडून मिळविले.

१५. अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची बैठक दिनांक २६ जून १९९५ रोजी झाली. विद्यार्थी संघटनेच्या ८-१० मागण्यामध्ये ८ व्या क्रमांकावर शिक्षक भवनाबाबतचा निर्णय रद्द करावा अशीही एक मागणी होती. सर्व परिस्थितीचा विचार करून व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयात (विषय क्रमांक ४३) असे म्हटले होते की, "ज्या तुलनात्मक वस्तुस्थितीच्या (Facts) आधारावर दिनांक ३ जून १९९५ रोजीच्या बैठकीमध्ये उपरोक्त शिक्षक भवनाबाबत निर्णय घेण्यात आला होता त्या **वस्तुस्थितीमध्ये कोणताही बदल झालेला नसल्यामुळे घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही असे ठरविण्यात आले.**" व्यवस्थापन परिषदेचा संपूर्ण निर्णय **(सहपत्र चार)** स्वतंत्रपणे याच अंकात छापलेला आहे.

१६. विद्यापीठाच्या निर्णयाच्या बाबतीत "पायरीवाले आमदार" यांनी शासनाला असे लिहिले की "विद्यापीठाची मालमत्ता असलेले शिक्षक भवन विद्यापीठाने हस्तांतरीत केले आहे हे हस्तांतरण रद्द करण्याचे आदेश व्हावेत." मागचा पुढचा विचार न करता महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ३० सप्टेंबर १९९५ चा "काळा हुकूम" **(सहपत्र दोन)** विद्यापीठावर बजावला. या हुकुमात असे नमूद आहे की, "विद्यापीठाने "शिक्षक भवनाची" वास्तु नुटाला हस्तांतरित करून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८(१)(ड) चा भंग केला आहे."

१७. महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या कलम ८ (१)(ड) चा भंग झालेला आहे म्हणजे नक्की काय झाले आहे ते पहाण्यासाठी मुळातून हे कलमच पाहिले पाहिजे. कलम ८(१)(ड) मध्ये असे म्हटले आहे की :-

**विद्यापीठ "ठराविक प्रयोजनासाठी मिळालेला कोणताही निधी तो ज्या प्रयोजनासाठी मिळालेला आहे त्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापरणार नाही.**" विद्यापीठाने या प्रकरणात ठराविक प्रयोजनासाठी मिळालेला निधी ज्यासाठी मिळाला त्याच प्रयोजनासाठी वापरलेला आहे, मग ८(१)(ड) चा भंग कसा काय होतो? चुकून शासनाने आपल्या हुकुमामध्ये "**ड**" लिहिला असेल, कदाचित शासनाला "**ई**" म्हणावयाचे असेल म्हणून "**ई**" मुळातून पाहिले तर कलम ८ (१)(ई) मध्ये असे म्हटले आहे. :-

विद्यापीठ "स्थावर मालमत्ता विक्रीव्दारे अथवा भाडेपट्ट्याव्दारे हस्तांतरण करणार नाही." येथे स्थावर मालमत्ता विक्रिव्दारे अथवा भाडेपट्ट्याव्दारे हस्तांतरीत करण्यात आलेली नाही तरीही शासनाने हा काळा हुकूम काढलेला आहे.

१८. विशिष्ट प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीने १९८८ मध्ये दिलेला एक लाख रुपयाचा निधी आपल्या विधीमय अधिकारांचा वापर करून त्या प्रयोजनासाठी आपण स्वीकारलेला आहे असे विद्यापीठाने १९८९ मध्ये कळवावयाचे व **तो त्याच प्रयोजनार्थ वापरण्याची कारवाई १९९५ मध्ये पार पडल्यानंतर ती कारवाई रद्द करण्याचा शासनाचा ३० सप्टेंबर १९९५ चा काळा हुकूम पाहिला म्हणजे "हे खुदा तु अनेकांना राजा बनवतोस परंतु त्यांना राजाचे ह्रदय दे" अशी प्रार्थना करण्याची पाळी आपल्यावर आल्याशिवाय रहात नाही.**

१९. विद्यापीठाची स्वायत्तता वगैरे "लंब्याचवड्या बाता" बाजूला ठेवल्या तरी आपण स्वीकारलेला दान निधी ज्या प्रयोजनासाठी स्वीकारला त्या प्रयोजनासाठी वापरण्याइतका औपचारिक अधिकारसुद्धा विद्यापीठांना शिल्लक उरला नाही काय? आपल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या कार्यालयीन वापरासाठी लहानशी जागा सुद्धा देण्यासाठी विद्यापीठाच्या गात्रामध्ये त्राण उरु नये एवढा १९९४ चा महाराष्ट्र विद्यापीठ कायदा "थर्ड क्लास" झाला आहे काय? का केवळ पायरीवाल्या आमदारांनी केलेल्या आग्रहामुळे शासनाने हा काळा हुकूम काढला आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

२०. अमरावती विद्यापीठ सिनेटच्या दिनांक २५ व २६ नोव्हेंबर १९९५ च्या बैठकीमध्ये "शिक्षक भवन" बाबत विचारण्यात आलेले प्रश्न व विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने मा. कुलगुरू डॉ. एस.टी.देशमुख यांनी दिलेली उत्तरे स्वतंत्रपणे याच अंकात प्रसृत केलेली आहेत. विद्यापीठाने आपला निर्णय फिरवावा म्हणून विद्यापीठाच्या मा. कुलगुरुवर व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांवर नाना मार्गांनी दडपणे आणण्याचे प्रयत्न होत आहे. सिनेटमधील प्रश्नोत्तरातील अनुपुरक चर्चेच्या वेळी मा. कुलगुरुंनी काढलेले उद्‌गार लक्षात घेता या शासकीय दडपणाचा स्तर सहज लक्षात येवू शकतो. विद्यापीठावर अशी दडपणे आणणे किती निरर्थक असते हे अंतिमतः सिध्द होईल याविषयी आमच्या मनामध्ये मुळीसुद्धा शंका नाही व त्यातूनच विद्यापीठाला पायरीने वागायला सांगणारांचे सुद्धा पितळ उघडे पडल्याशिवाय रहाणार नाही.

- **बी.टी.देशमुख**, *विधानपरिषद सदस्य* -

**नियोजित कामासाठी घेतलेला निधी त्याच कामासाठी विद्यापीठाने वापरला तर तो कलम ८ (१) (ड) प्रमाणे गुन्हा होतो काय?**

# अमरावती विद्यापीठ सिनेटच्या दिनांक २५ व २६ नोव्हेंबर १९९५ च्या बैठकीमध्ये "शिक्षक भवन" बाबत विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने मा. कुलगुरू डॉ. एस.टी.देशमुख यांनी दिलेली उत्तरे

### प्राचार्य एस.बी.चिंचमलातपूरे यांचे प्रश्न

**प्रश्न क्रमांक : ३९**

**अ)** विद्यार्थी, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक तसेच विद्यापीठाचे शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पंजीबध्द प्रातिनिधिक संघटनेच्या कामकाजाकरिता विद्यापीठ परिसरामध्ये यथोचित जागा उपलब्ध करून देण्याच्या सर्वसाधारण धोरणास अनुसरून विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनेस सध्या तात्पुरती जागा उपलब्ध करून देण्यात आली असून स्थायी स्वरूपाचे शिक्षकेतर कर्मचारी भवन बांधण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**ब)** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नुटा या पंजीबध्द संघटनेला सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर कार्यालयीन वापराकरिता शिक्षक भवन सोपविण्याचा विद्यापीठाचा निर्णय विद्यापीठाच्या कुलसचिवांनी दिनांक ५ जून १९९५ च्या पत्रान्वये या संघटनेच्या कोषाध्यक्षांना कळविला होता हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**क)** खरे असल्यास "बुक्टु" या शिक्षक संघटनेस मुंबई विद्यापीठाने चर्चगेटजवळील 'क्लब हाउस' या आपल्या इमारतीत कार्यालयीन वापरासाठी गेल्या अनेक वर्षापासून जागा उपलब्ध करून दिली आहे तसेच नुटा या संघटनेला नागपूर येथे याच प्रयोजनासाठी डी लक्ष्मीनारायण यांच्या बंगल्यात प्रशस्त जागा कार्यालयीन वापराकरिता गेल्या अनेक वर्षापूर्वी उपलब्ध करून दिल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने हा निर्णय घेण्यापूर्वी करून घेतली होती हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

*सहपत्र तीन : परिच्छेद ७ व ११ पहा*

### अमरावती विद्यापीठ, अमरावती *शिक्षक भवन हस्तांतरणासंबंधी प्रसिद्ध झालेल्या वृत्ताचा खुलासा*

दै. तरुण भारत (नागपूर) दि. १४.६.९५ च्या व दै. इंडियन एक्स्प्रेस (नागपूर) दि.१६.६.९५ च्या अंकात अमरावती विद्यापीठ परिसरातील शिक्षक भवनाविषयी प्रसिद्ध झालेल्या वार्तापत्रातील मजकूर गैरसमजावर आधारित असून वस्तुस्थितीच्या माहितीच्या अभावी प्रसिद्ध झालेला दिसतो. त्यासंबंधी विद्यापीठाचा खुलासा पुढीलप्रमाणे

२) विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांच्या अधिकृत, पंजिबध्द प्रातिनिधीक संघटनेच्या कामकाजाकरिता विद्यापीठ परिसरामध्ये यथोचित जागा उपलब्ध करून देण्याच्या सर्वसाधारण धोरणास अनुसरून शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संघटनेस यापूर्वीच तात्पुरती जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागपूर येथे पूर्ण चंद्रराव बुटी मेमोरियल हॉल यासारखा मोठा परिसर व वास्तू विद्यार्थी संघासाठी उपलब्ध आहे. अमरावती विद्यापीठ परिसरामध्ये "विद्यार्थी भवन" पूर्णत्वास आले असून लवकरच ते कार्यान्वित करण्याची कारवाईहि चालू आहे.

३) नागपूर विद्यापीठाने "नुटा" या शिक्षक संघटनेला विधी महाविद्यालयाला लागून असलेल्या डी. लक्ष्मीनारायण यांच्या बंगल्यातील प्रशस्त जागा अनेक वर्षापूर्वी कार्यालयासाठी उपलब्ध करून दिली आहे. अमरावती विद्यापीठ परिसरामध्ये जागेच्या टंचाईमुळे हे शक्य झाले नव्हते. तथापि "संलग्न महाविद्यालये व विद्यापीठे यामध्ये काम करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांच्या पंजीकृत असलेल्या संघटनेच्या कामकाजासाठी शिक्षक भवन उभे करण्याचा" निर्णय २९ एप्रिल १९८९ च्या बैठकीमध्ये त्यावेळच्या कार्यकारी मंडळाने घेतला होता. याच प्रयोजनासाठी १ लाख रुपयाची देणगी सुध्दा त्यावेळी विद्यापीठाला प्राप्त झाली होती व सदरहू देणगीनुसारची कारवाई सुध्दा पूर्ण करण्यात येत आहे. ही वास्तू पूर्णत्वाला आल्यानंतर दिनांक १ जुलै १९९४ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून पंजिबध्द शिक्षक संघटनांकडून अर्ज मागविण्यात आले होते. या प्रत्येक संघटनेने (१) नांव (२) नोंदणी क्रमांक व वर्ष (३) मागील तीन वर्षाचे अंकेक्षीत लेखे (४) सभासद संख्या याबाबतची माहिती दाखल करावी असेही नमूद करण्यात आले होते.

४) याबाबत एक समिती नेमण्यात आली होती ही गोष्ट खरी आहे. "प्रा. एस.एस. तानकर हे या समितीचे सदस्य होते" हा बातमीतील उल्लेख वस्तुस्थितीवर आधारित नाही. "समिती मधील केवळ एक मत "नुटा" च्या बाजूने तर दोन व्यक्ती या प्रस्तावाच्या विरोधात असल्याचे पूर्वीच उजेडात आले होते" हा वार्तापत्रातील उल्लेख सुद्धा वस्तुस्थितीवर आधारित नाही. प्रा. येनकर, प्रा.क्षीरसागर व प्रा.ठोंबरे या तिघांच्या समितीने दिलेला अहवाल एकमताचा असून "व्यवस्थापन परिषदेने याबाबत निर्णय घ्यावा" असे या एकमताच्या अहवालामध्ये स्पष्टपणे नमूद आहे.

५) या प्रयोजनासाठी नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचा (नुटा) अर्ज मान्य करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेनेच दिनांक ३ जून १९९५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतला. "उटा" या नावाच्या कोणत्याही संघटनेने अर्ज केलेला नव्हता व त्यामुळे तो विचारात घेण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही.

"नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ" नागपूर व दारव्हा जि. यवतमाळ येथून अमरावती विद्यापीठ ग्रामीण शिक्षक मंच या दोनच संघटनाचे अर्ज विद्यापीठाकडे आलेले होते. (१) पहिल्या संघटनेने ३२८२ सदस्यांची मुद्रित यादी आपल्या अर्जासोबत जोडली होती. दुसऱ्या संघटनेने सदस्यांची अशी कोणतीही यादी सोबत जोडलेली नव्हती. मात्र आपली सदस्य संख्या ३५० असल्याचे नमूद केले होते. (२) दाखल झालेल्या कागदपत्रानुसार पहिली संघटना १९६३ मध्ये स्थापन झाली असून १९७३ मध्ये पंजिबध्द झालेली आहे. दुसरी संघटना वृत्तपत्रामध्ये जाहिरात येण्याच्या २-३ महिने अगोदर म्हणजे ४ मार्च, १९९४ ला पंजिबध्द झाल्याचे दिसून येते. (३) पहिल्या संघटनेने अर्जापूर्वीचे तीन वर्षाचे अंकेक्षीत लेखे अर्जासोबत सादर केले असून दुसरी संघटना नुकतीच स्थापन झालेली असल्यामुळे अंकेक्षित लेखे सादर करू शकली नाही.

या मुद्यांचा तुलनात्मक विचार करून व्यवस्थापन परिषदेने पहिल्या संघटनेचा अर्ज मान्य केला. "नुटा ही संघटना नागपूर विद्यापीठ कार्यक्षेत्रापुरती मर्यादित आहे" हे वार्तापत्रातील विधानसुद्धा वस्तुस्थितीवर आधारित नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात न घेता संबंधित वृत्तपत्राने हे वृत्त प्रसिद्ध केले आहे. या वृत्तामुळे जनमानसात गैरसमज निर्माण होऊ नये, वस्तुस्थिती वाचकांच्या लक्षात यावी म्हणून विद्यापीठाच्या वतीने सदर खुलासा करण्यात येत आहे.

प्रति,

**दिनांक :** १६.६.१९९५

मा.संपादक/जिल्हा प्रतिनिधी, अमरावती.
स.न.वि.वि.
कृपया उपरोक्त खुलासा आपल्या वृत्तपत्रात ठळकपणे प्रसिद्ध करावा ही विनंती,

आपला विश्वासू
स्वा./- **किशोर फुले**
जनसंपर्क अधिकारी

## मुंबईत एक न्याय, नागपूरात तोच न्याय, मग एकट्या अमरावती विद्यापीठात वेगळा न्याय कसा लावता येईल?

**प्रश्न क्रमांक : ४०**

**अ)** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नुटा या पंजीबध्द संघटनेला सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर कार्यालयीन वापराकरिता शिक्षक भवन सोपवण्याचा विद्यापीठाचा निर्णय विद्यापीठाच्या कुलसचिवांनी दिनांक ५ जून १९९५ च्या पत्रान्वये या संघटनेच्या कोषाध्यक्षांना कळविला होता हे खरे आहे काय?

**उत्तर :** कृपया वरील ३९ ब चे उत्तर पहावे

**ब)** ज्या नुटा या शिक्षक संघटनेची निवड करण्यात आली त्या संघटनेने आपल्या अर्जासोबत सादर केलेल्या घटनेप्रमाणे त्या संघटनेचे कार्यक्षेत्र विदर्भाच्या ९ जिल्ह्याइतके आहे हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**क)** या संघटनेने आपल्या तीन हजारावर सदस्यांची मुद्रित यादी आपल्या अर्जासोबत सादर केली असून त्यामध्ये सदस्यांची जिल्हानिहाय विभागणी सुध्दा सादर करण्यात आली असून त्याप्रमाणे अमरावती जिल्ह्यामध्ये या संघटनेचे सर्वात जास्त सदस्य आहेत हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**ड)** नुटा या ९ जिल्ह्याचे कार्यक्षेत्र असलेल्या संघटनेचे एकट्या अमरावती जिल्ह्यामध्ये जेवढे सदस्य आहेत त्याच्या निम्मे सदस्य दुसऱ्या अर्जदार संघटनेचे या चारही जिल्ह्यामध्ये नव्हते/नाहीत ही माहिती विद्यापीठाला निर्णय घेण्यापूर्वी उपलब्ध झाली होती हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**इ)** नुटाने आपल्या ३२८२ सदस्यांची मुद्रित यादी विद्यापीठाला सादर केली होती पण दुसऱ्या संघटनेने अशी कोणतीही यादी सादर केली नव्हती मात्र ३५० सदस्य असल्याची मोघम माहिती नमूद केली होती हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**ई)** नुटा या संघटनेने विद्यापीठाने वृत्तपत्रातुन जाहिरात दिल्याप्रमाणे तीन वर्षाचे अंकेक्षित लेखे आपल्या अर्जासाईबत सादर केले होते पण दुसऱ्या संघटनेने मात्र अशा प्रकारचे लेखे सादर केलेले नव्हते हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**फ)** दुसरी संघटना २-४ महिन्यापूर्वीच पंजीबध्द करण्यात आल्यामुळे ३ वर्षाचे अंकेक्षित लेखे या संघटनेला देता येणे शक्य नव्हते हे खरे आहे काय?

**उत्तर :** संघटना दिनांक ७.३.९४ रोजी पंजीबध्द झालेली आहे. सदर संघटनेने अंकेक्षीत लेखे अर्जासोबत जोडलेले नव्हते.

**प्रश्न क्रमांक : ४१**

**अ)** शिक्षकभवनासंबंधी "नुटाबाबत समितीसमोर प्रस्ताव आला असता समितीमधील केवळ एक मत नुटाच्या बाजूने तर दोन व्यक्ती या प्रस्तावाच्या विरोधात असल्याचे पुर्वीच उजेडात आले होते" ही दिनांक १४ जून १९९५ च्या दै. तरूणभारत मध्ये आलेली बातमी पूर्णपणे असत्य असल्याचा खुलासा विद्यापीठातर्फे १६ जून १९९५ रोजी एक पत्रक काढून करण्यात आला होता हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**ब)** विद्यापीठाने जाहिरात देवून माहिती मागविली असता "उटा" या नावाच्या कोणत्याहि संघटनेने अर्ज केलेला नव्हता व त्यामुळे तो विचारात घेण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही असेही या खुलाशात नमूद करण्यात आले होते हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**क)** "नुटा ही संघटना नागपूर विद्यापीठ कार्यक्षेत्रापुरती मर्यादित आहे" हा तरुण भारताच्या बातमी मधील उल्लेख वस्तुस्थितीवर आधारित नाही असेही विद्यापीठाने आपल्या खुलाशात नमूद केले होते हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**ड)** खरे असल्यास मूळ असत्य बातमी जेवढ्या ठळकपणे या दैनिकाने छापली तेवढ्या ठळकपणे खुलासा मात्र छापला नाही हेही खरे आहे काय?

**उत्तर :** होय

## श्री.मिलींद चिमोटे यांचे प्रश्न

**प्रश्न क्रमांक : ४२**

**अ)** १ जुलै १९९४ रोजी किंवा त्या दरम्यान वृत्तपत्रामध्ये एक जाहिरात देवून विद्यापीठ परिसरामध्ये शिक्षक संघटनेच्या कार्यालयीन वापरासाठी बांधण्यात आलेले शिक्षक भवन सोपविण्यासाठी पंजीकृत शिक्षक संघटना कडून विद्यापीठ प्रशासनाने अर्ज मागविले होते हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**ब)** खरे असल्यास या अर्जासोबत (A) शिक्षक संघटनेचा नोंदणी क्रमांक, नाव व नोंदणीचे वर्ष (B) संघटनेचे मागील तीन वर्षाचे अंकेक्षित लेखे (C) सभासद संख्या, याबाबतची माहिती सादर करण्याची सूचना सुध्दा या जाहिरातीतून देण्यात आली होती हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**क)** खरे असल्यास ठरवून दिलेल्या मुदतीत किती संघटनांचे अर्ज विद्यापीठाकडे आले होते व त्या संघटनांची नावे काय?

**उत्तर : क)** १. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना
२. अमरावती विद्यापीठ ग्रामीण शिक्षक मंच

**ड)** प्रश्न भाग 'ब' मध्ये नमूद केलेल्या मुद्यावर या दोनही संघटनांनी सादर केलेल्या तुलनात्मक माहितीचे स्वरूप काय आहे?

**उत्तर : ड)** १. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना नोंदणी क्र. महा/१५/७३(नाग) नोंदणीचे वर्ष १९७३ अंकेक्षित लेखे १९९१, १९९२व १९९३ सोबत जोडले होते. सभासद संख्या ३२८२ होती. सोबत सदस्यांची मुद्रित यादी जोडली होती.

२. अमरावती विद्यापीठ ग्रामीण शिक्षक मंच नोंदणी क्र. एनजीपी/४१७०/७ मार्च ९४ नोंदणी वर्ष १९९४. अंकेक्षित लेखे सोबत जोडले नव्हते. सभासद संख्या ३५० दर्शविण्यात आली होती. मात्र सदस्यांची यादी सोबत जोडलेली नव्हती.

**इ)** अर्जदार संघटनापैकी एक संघटना अर्ज सादर करण्याच्या ४-६ महिने अगोदर पंजीकृत झाली होती हे खरे आहे काय? असल्यास त्या संघटनेचे नाव काय?

**उत्तर :** अमरावती विद्यापीठ ग्रामीण शिक्षक मंच दारव्हा. ही संघटना त्यांनी सादर केलेल्या माहितीप्रमाणे दिनांक ७.३.९४ रोजी पंजीबद्ध करण्यात आलेली होती.

**प्रश्न क्रमांक : ४३**

**अ)** "संलग्न महाविद्यालये व विद्यापीठे यातून काम करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांच्या पंजीकृत असलेल्या कार्यरत संघटनेच्या कामकाजासाठी शिक्षक भवन उभारण्याच्या" प्रयोजनासाठी २७ एप्रिल १९८९ च्या पत्रान्वये दानदाते डॉ. उध्दव देशमुख यांनी एक लाख रुपयाची देणगी विद्यापीठाला देवू केली होती हे खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**ब)** खरे असल्यास याच पत्रान्वये या वास्तूला आपल्या दिवंगत पत्नीचे नाव दिले जावे अशी विनंती त्यांनी केली होती हेही खरे आहे काय?

**उत्तर :** होय

**क)** खरे असल्यास ही देणगी स्वीकारण्याचा व त्यांची विनंती मान्य करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने दिनांक २९ एप्रिल १९८९ च्या बैठकीमध्ये घेतला होता हे खरे आहे काय?

**शासन आपल्या कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या कामकाजासाठी मंत्रालयात जागा देवू शकते ?**

**उत्तर** : होय

**ड)** खरे असल्यास ही देणगी स्वीकारण्याचा व त्यांची विनंती मान्य करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतलेला आहे असे दिनांक २५ मे, १९८९ च्या पत्रान्वये अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांनी देणगी दात्यांना एक पत्र पाठवून कळविले होते हेही खरे आहे काय?

**उत्तर** : होय

**इ)** खरे असल्यास सदरहू निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठाने केलेल्या कारवाईचे स्वरूप काय?

**उत्तर** : याबाबतची कारवाई पूर्ण केली असून सभागृहाचे नामकरण दि. ३०.७.९५ रोजी करण्यात आले.

**प्रश्न क्रमांक : ४४**

**अ)** महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या कलम ८(१)(इ) मध्ये नमूद असल्याप्रमाणे अमरावती विद्यापीठ परिसरामध्ये बांधण्यात आलेली शिक्षक भवन ही वास्तू एखाद्या संघटनेला मालमत्तेच्या विक्रीव्दारे किंवा भाडेपट्ट्याव्दारे हस्तांतरीत करण्यात आली हे खरे आहे काय?

**उत्तर** : नाही

**ब)** विक्रीव्दारे किंवा भाडेपट्ट्याव्दारे या वास्तूचे हस्तांतरण करण्यात आल्याची चुकीची माहिती पुरवण्यात आल्यामुळे शासनाने ३० सप्टेंबर १९९५ च्या एका पत्रान्वये हे हस्तांतरण रद्द करावे असे विद्यापीठास कळविले हे खरे आहे काय?

**उत्तर** : शासनाचे दिनांक ३०.९.९५ चे पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रानुसार - "शिक्षक भवनाची वास्तु नुटा ला हस्तांतरीत करून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम ९४ मधील कलम ८(१) (ड) चा भंग केला आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम ९४ मधील कलम ८ (४) प्रमाणे ही स्थावर मालमत्ता असुन आपण ती तात्काळ परत ताब्यात घ्यावी" - असे कळविण्यात आले आहे.

**क)** याबाबतची वस्तुस्थिती तसेच "ठराविक प्रयोजनासाठी मिळालेला कोणताही निधी तो ज्या प्रयोजनासाठी मिळालेला आहे त्या प्रयोजनाव्यतीरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही" ही महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या

सहपत्र चार : परिच्छेद १५ पहा

## University Amravati : Minutes of Item No. 43 of meeting of the Managemnet Council held on 26th June, 1995

Item no. 43 :
Utilisation of Shikshak Bhavan :

**(A)** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केलेल्या मागणी क्रमांक ८ वर **विचार करण्यात आला.**

**(B)** याबाबत दिनांक ३ जून १९९५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विषय क्रमांक २४ वर व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेत असतांना सदरहू बाबतीत कार्यालयाने जी माहिती पुरवली होती त्याची पुनश्च **नोंद घेण्यात आली. नोंद घेतलेले मुद्दे** पुढील प्रमाणे :-

(१) विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांच्या अधिकृत, पंजिबध्द प्रातिनिधीक संघटनेच्या कामकाजाकरिता विद्यापीठ परिसरामध्ये यथोचित जागा उपलब्ध करून देण्याच्या सर्वसाधारण धोरणास अनुसरून शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संघटनेस यापूर्वीच तात्पुरती जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अमरावती विद्यापीठ परिसरामध्ये "विद्यार्थी भवन" पूर्णत्वास आले असून लवकरच ते कार्यान्वित करण्याची कारवाई चालू आहे.

(२) "संलग्न महाविद्यालये व विद्यापीठे यामध्ये काम करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांच्या पंजीकृत असलेल्या संघटनेच्या कामकाजासाठी शिक्षक भवन उभे करण्याचा निर्णय" २९ एप्रिल १९८९ च्या बैठकीमध्ये त्यावेळच्या कार्यकारी मंडळाने घेतला होता. याच प्रयोजनासाठी १ लाख रुपयाची देणगी सुद्धा त्यावेळी विद्यापीठाला प्राप्त झाली होती. देणगीदात्यांनी त्यांच्या २७.४.१९८९ च्या पत्रान्वये केलेली विनंती त्यावेळच्या कार्यकारी मंडळाने मान्य केली होती. सदरहू देणगीशी अनुषंगिक कारवाई पूर्ण करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(३) ही वास्तू पूर्णत्वाला आल्यानंतर दिनांक १ जुलै १९९४ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून पंजिबध्द शिक्षक संघटनांकडून अर्ज मागविण्यात आले होते. या प्रत्येक संघटनेने (१) नांव (२) नोंदणी क्रमांक व वर्ष (३) मागील तीन वर्षाचे अंकेक्षीत लेख (४) सभासद संख्या याबाबतची माहिती दाखल करावी असेही या जहिरातीत नमूद करण्यात आले होते.

(४) "नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ" नागपूर व दारव्हा जि. यवतमाळ येथून अमरावती विद्यापीठ ग्रामीण शिक्षक मंच या दोनच संघटनाचे अर्ज विद्यापीठाकडे आलेले होते. (१) पहिल्या संघटनेने ३२८२ सदस्यांची मुद्रित यादी आपल्या अर्जासोबत जोडली होती. दुसऱ्या संघटनेने सदस्यांची अशी कोणतीही यादी सोबत जोडलेली नव्हती. मात्र आपली सदस्य संख्या ३५० असल्याचे नमूद केले होते. (२) दाखल झालेल्या कागदपत्रानुसार पहिली संघटना १९६३ मध्ये स्थापन झाली असून १९७३ मध्ये पंजिबध्द झालेली आहे. दुसरी संघटना वृत्तपत्रामध्ये जाहिरात येण्याच्या २-३ महिने अगोदर म्हणजे ४ मार्च, १९९४ ला पंजिबध्द झाल्याचे दिसून येते. (३) पहिल्या संघटनेने अर्जापूर्वीचे तीन वर्षाचे अंकेक्षीत लेखे अर्जासोबत सादर केले असून दुसरी संघटना नुकतीच स्थापन झालेली असल्यामुळे अंकेक्षित लेखे सादर करू शकली नाही.

(५) नागपूर विद्यापीठाने "नुटा" या संघटनेस डी. लक्ष्मीनारायण बंगल्यामध्ये कार्यालयासाठी अनेक वर्षापूर्वी जागा उपलब्ध करून दिली असून मुंबई विद्यापीठाने चर्चगेट जवळील क्लब हाऊस मध्ये "बुक्टु" या संघटनेस अशीच जागा उपलब्ध करून दिली आहे.

(६) पहिल्या संघटनेने केलेल्या अर्जासोबत आपल्या घटनेची प्रत जोडली असून या पंजिकृत घटनेच्या आर्टीकल ३ मध्ये असे नमुद आहे की :-

Membership of the Association shall be open to the teachers, including the junior college teachers, P.E.Ts and Librarians in the colleges and in the institutions maintained by the Nagpur and Amravati University and in the Colleges affiliated to Nagpur and Amravati University."

यात अर्जासोबत संघटनेच्या १ ते ३२८२ सदस्यांची आद्याक्षरानुसार तयार केलेली मुद्रित यादी दिलेली असून या यादीच्या पृष्ठ क्र. ११ वर सदस्यांची जिल्हानिहाय फोड देण्यात आलेली आहे. अवलोकन करतांना असे आढळून आले की सर्वात जास्त म्हणजे ७९१ सदस्य अमरावती जिल्ह्यामध्ये आहेत.

**(C)** ज्या तुलनात्मक वस्तुस्थितीच्या (क्ष्ड्ड्यद्य) आधारावर दिनांक ३ जून १९९५ रोजीच्या बैठकीमध्ये उपरोक्त शिक्षक भवनाबाबत निर्णय घेण्यात आला होता त्या **वस्तुस्थितीमध्ये कोणताही बदल झालेला नसल्यामुळे घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही असे ठरविण्यात आले.**

**(D)** अशा अनेक संघटना भविष्यात अशी ढवळाढवळ करतील. अशी जी भिती अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मागणीमध्ये व्यक्त करण्यात आली आहे. त्याबाबत असे नमूद करण्यात येत आहे की ही जाहिरात वृत्तपत्रामध्ये येण्याच्या दोन तीन महिने अगोदर एक संघटना पंजिबद्ध करण्यात आली ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या लक्षात आली असून "संघटना पंजिबद्ध होवून किमान १० वर्षे झाले नसतील व अशा दहा वर्षाचे अंकेक्षित लेखे सादर करण्यात आले नसतील तर तुलना करण्याच्या प्रयोजनासाठीसुद्धा अशा संघटनेचा विचार होता कामा नये" असे ठरविण्यात आले.

**(E)** उपरोक्त परिच्छेद (२) मध्ये नमूद करण्यात आलेल्या देणगीशी अनुषंगिक **कारवाई पुढील १५ दिवसामध्ये पूर्ण करण्यात यावी असेही ठरविण्यात आले.**

कलम ८ (१) (ड) मधील तरतूद शासनाच्या लक्षात आणून देण्यासाठी विद्यापीठाने काय कारवाई केली आहे?

**उत्तर :** या संदर्भात वस्तुस्थिती दर्शविणारे पत्र शासनाला पाठविण्यात आलेले आहे.

**ड)** कारवाई केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**उत्तर :** प्रश्न उद्‌भवत नाही.

### श्री. वसंतराव मालधुरे यांचे प्रश्न

**प्रश्न क्रमांक ५४**

**अ)** विद्यापीठ कायद्यातील कलम ८/४ नुसार महाराष्ट्र शासनाने शिक्षक भवनाच्या अवैध हस्तांतरणाबाबत आदेश दिले काय?

**उत्तर :** "शिक्षक भवनाची वास्तु "नुटा" ला हस्तांतरीत करून महाराष्ट्र विद्यापीठ कायदा ९४ मधील कलम ८(१)(ड) चा भंग केला आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम ९४ मधील कलम ८(४) प्रमाणे ही स्थावर मालमत्ता असून ती तात्काळ ताब्यात घ्यावी" असे शासनाने दिनांक ३० सप्टेंबर ९५ च्या पत्रानुसार कळविले आहे.

**ब)** दिले असल्यास ते हस्तांतरण रद्द केले काय?

**क)** रद्द केले नसल्यास हि विद्यापीठाची कृती कायद्याचा भंग करणारी नाही काय?

**उत्तर : ब) व क)** :- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मध्ये कलम ८ (१)(ड) मध्ये खालील तरतुद आहे. :-

"ठराविक प्रयोजनासाठी मिळालेला कोणताही निधी तो ज्या प्रयोजनासाठी मिळालेला आहे त्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापरणार नाही" याबाबत ठराविक प्रयोजनासाठी मिळालेला (Earmarked) एक लाख रूपयाचा दाननिधी त्याच कामासाठी वापरला गेला असे शासनाला कळविण्यात आले आहे.

तसेच म.वि. कायदा कलम ८(१)(इ) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे. :-

"स्थावर मालमत्ता विक्रीव्दारे अथवा भाडेपट्ट्याव्दारे हस्तांतरण करणार नाही." सदरहू मालमत्ता विक्रीव्दारे अथवा भाडेपट्ट्याव्दारे हस्तांतरीत करण्यात आलेली नसल्यामुळे ते रद्द करण्याचा प्रश्न उदभवला नाही असे शासनाला कळविण्यात आले आहे.

## NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

State level Protest Congregation. 1. To condemn the Black order dated 30th Sept. 1995 issued by Dept. of Higher and Technical Education, Govt. of Maharashtra, dictating the Amravati University to cancel its decision in respect of "Shikshak Bhavan", 2. To resist this prejudicial invasion on the University autonomy on the basis of false, illegal and extra constitutional factors, and 3. To uphold the spirit of just and legal claim of the teachers' organisations and to plan further line of action to ward off the political and unacademic influences

on the functioning of the Universities.

# STATE LEVEL PROTEST CONGREGATION

is organised at the Place, Date and Time mentioned below

**Dr. K.K.Theckedath**

**President** , All India Federation of University & College Teachers' Organisations (AIFUCTO) and

**Prof. Sambhajirao Jadhao**

**President,** Maharashtra Federation of University & College Teachers' Organisations (MFUCTO)

have kindly consented to be the Chief Guests for this Congregation. and

**Prof. B.T.Deshmukh, MLC**

**President,** Nagpur University Teachers' Association., will preside.

: VENUE :

HUTATMA SMARAK, Nehru Maidan, Rajkamal Chowk, Amravati.

Date : Sunday, the 28th January 1996. Time : 3.30 P.M.

All teachers are requested to attend this congregation and to stand erect against the arbitrary decisions of the state Government in such matters of vital importance.

R.Chittaranjan C.D.Kongare
Vice Presidents NUTA

E.H. Kathale
Secretary NUTA

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **PUBLISHER AND ACTING EDITOR :** R. Chittaranjan, Gulmohar Colony, Camp, Amravati-444 602 Composed at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Someshwar Printing Press, Satidham Market Amravati. (M.S) **REGD NO.** ATI 263 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10**
Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **07 - 12 - 1995**

**if Undelivered please return to :**
NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan,
Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.